पुढारी MY कोल्हापूर सोमवार, ११ मार्च २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये आजपासून स्पंदन कलाप्रदर्शन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेजच्या बी.व्होक. विभागामार्फत ग्राफिक डिझाईन, ॲनिमेशन ॲण्ड फिल्म मेकींग व फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या वर्षभरातील कलाकृतींचे कलाप्रदर्शन ११ ते १३ मार्च या कालावधीत शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये आयोजित केले आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन पुणे येथील प्रसिध्द् चित्रकार अमित ढाणे यांच्या सोमवारी सकाळी १० वाजता होणार आहे. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे असणार आहेत. प्रदर्शनाचे समन्वयक म्हणून प्रा.धीरज निंबाळकर म्हणून काम पाहत आहेत.

दरम्यान, विवेकानंद कॉलेजच्या बी.व्होक ग्राफिक डिझाईन विभागाची माजी विद्यार्थिनी सृष्टी शिंदे हिचे नुकतेच रेबीजने निधन झाले. तिच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रदर्शनामध्ये रेबीज विषयी जनजागृतीपर माहितीचे पोस्टर्स लावली जाणार आहेत.

दै. पुढारी 11/03/2024

# डॉ. दीपक तुपे यांच्या संशोधन प्रकल्पास पाच लाख अनुदान मंजूर

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज हिंदी विभागातील सहायक प्रा. डॉ. दीपक तुपे यांना भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्लीच्या वतीने 'अहिंदी भाषी क्षेत्र में हिंदी भाषा का विकास: समस्या एवं समाधान' विषयाच्या संशोधन प्रकल्पासाठी पाच लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले. त्यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांनी सम्मानित केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौतुभ गावडे, डॉ. श्रुती जोशी यांनी डॉ. तुपे यांचे अभिनंदन केले.डॉ. तुपे यांना १५ वर्षे अध्यापनाचा तसेच १२ वर्षे संशोधनाचा अनुभव आहे. त्यांनी १० वर्षे पत्रकारिता केली आहे. १५५ चर्चासत्रांमध्ये शोध निबंधांचे वाचन केले आहे. त्यांचे ६३ संशोधन लेख पत्रिकेत प्रकाशित झाले आहेत.